सं.फौ.ख.क्र.३०२/२०२५
शासन वि. रामा
**निशाणी क्र.१०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांची जबानी शपथेवर सुरू**

माझे नाव :- विजय छगनराव लबडे,
माझे वय :- ३२ वर्षे,
व्यवसाय :- पोलीस शिपाई, ब.नं. १५६३, पोलीस स्टेशन, मानवत,
राहणार :- मानवत, ता. मानवत व जि. परभणी.

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांचा सरतपास श्री. पी. एम. लिहीणे सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–**

दिनांक ०५/०८/२०२४ रोजी मी पोलीस स्टेशन, मानवत येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी, पो.ह. नलावडे व रणेर असे रामपुरी बीट हद्दीत पेट्रोलिंग करत असताना आम्हाला गुप्त माहिती मिळाली की, एक इसम रामा साठे हा त्याच्या घराच्या मागच्या बाजुला दारुची अवैध विक्री करीत आहे. सदर ठिकाणी आम्ही छापा मारला असता आम्हाला देशी दारु भिंगरी संत्राच्या १८० मि.ली.च्या १२ सीलबंद बाटल्या असा एकुण रु.८४०/– चा मुद्देमाल मिळुन आला. पो.ह. नलावडे यांनी ती दारू दोन पंचासमक्ष जप्त करून जप्ती पंचनामा तयार केला व त्यापैकी एक बाटली सी.ए. तपासणीकामी राखुन ठेवली. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला येवुन आरोपीविरूध्द फिर्याद दाखल केली. आता मला सदर फिर्याद व छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आले. त्या दोन्हीवर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.११ व १२** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज न्यायालयासमक्ष हजर नाही.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी व त्यांचे विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब, आरोपीला सदर साक्षीदाराचा उलटतपास नाकारण्यात आला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रृ. नि. स्वि.,
स्वाक्षरीत/-

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.

मानवत
दिनांक: ११/०८/२०२६.